# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### हिंगोली ते धामणी रेल्वे स्टेशन दरम्यान लेव्हल क्रॉसिंग क्रमांक १४४ बी वर रेल्वे उड्डाणपुलाच्या बांधकामाबाबत

**(१) ५६१५ (०६-०५-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली ते धामणी रेल्वे स्टेशन दरम्यान लेव्हल क्रॉसिंग क्रमांक १४४ बी वर रेल्वे उड्डाणपुलाच्या बांधकामाकरिता शासनाचा ५० टक्के वाट्याचा निधी रेल्वेस सुपुर्द करण्याकरिता मा.स्थानिक लोकसभा सदस्य यांनी मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २९.११.२०१४ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०६-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) प्रश्नांकित रेल्वे उड्डाणुलाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

### पालघर जिल्हा सहकारी बँकेच्या निर्मितीबाबत

**(२) ९४३७ (०९-०४-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयाचे विभाजन होऊन नवीन पालघर जिल्हयाची निर्मिती झाली असल्याने ठाणे जिल्हा सहकारी बँकेचे विभाजन करून नवीन पालघर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक स्थापन करण्यासंबंधी पालघर जिल्हयातील नागरिकांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणी सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग कार्यालयाने सहकार आयुक्तालयास ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या स्टेटसबाबत बँकेकडून मिळालेली सांख्यिकीय माहिती सादर केलेली आहे.

(३) ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून प्राप्त संचालक मंडळ सभा दि. ३१/१०/२०१४ ठराव क्र.१५ (७) वरीष्ठ कार्यालयाकडे मार्गदर्शनार्थ सादर केला असता सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांचेकडील दि. ०३/०९/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांनुसार विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग या कार्यालयाने दि. २८/०९/२०१५ रोजीच्या पत्रान्वये ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस बँक विभाजनाबाबतचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

---

## मनसर ते मानेगाव राष्ट्रीय महामार्ग क्र.७, नागपूर-जबलपूर रोड तसेच मनसर वॉर्ड क्र. १ मधील निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत

**(३) ९५२६ (१०-०४-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनसर ते मानेगाव राष्ट्रीय महामार्ग क्र.७, नागपूर-जबलपूर रोड हे मार्ग गेल्या २ वर्षापासून अत्यंत नादुरूस्त असून त्या ठिकाणी अपघाताचे प्रमाणही वाढले असल्याने सदरच्या मार्गावरील रस्त्याच्या दुरूस्तीकरिता वारंवार संबंधित विभागाकडे स्थानिकांनी व लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मार्गाच्या दुरूस्तीकरिता शासनाने निधी उपलब्ध केला आहे काय, तसेच या मार्गाची दुरुस्ती शासनाकडून केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे,

(३) तसेच मनसर स्थानिक वॉर्ड क्र. १ मध्ये (जि.नागपूर) वर्षभरापूर्वी बांधण्यात आलेल्या सिमेंट रस्त्यांना भेगा पडल्याच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार मनसर ते मानेगांव या राष्ट्रीय महामार्गाच्या दुरुस्तीबाबत व मनसर वॉर्ड क्र. १ मधील निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित ठेकेदारांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणाबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-०३-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही असा अहवाल नागपूर ते जबलपूर या रा.म. क्रं-७ मधील मनसर ते मानेगाव या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम करण्याचा प्रस्ताव प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नागपूर यांचेकडून प्राप्त झाला आहे. तथापि मे, २०१५ ते नोव्हेंबर २०१५ पर्यंत सदर रस्त्याच्या लांबीच्या दुरुस्तीकरीता रु. २.३२ कोटी खर्च झाला असल्याचेही प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नागपूर यांनी कळविले आहे.
(३) होय.
(४) व (५) ग्रामपंचायत मनसर ता.रामटेक मार्फत २५१५ नागरी सुविधा अंतर्गत मनसर वार्ड क्र. १ मध्ये १५० मी. लांबीचे सिमेंट रस्त्याचे काम ०२.०७.२०१३ ते ०५.०८.२०१३ या कालावधीमध्ये करण्यात आलेले आहे. सदर काम पुर्ण झाल्यानंतर लगेचच या रस्त्यावर ट्रकची जडवाहतुकीमुळे ५० मी. लांबीच्या रस्त्याच्या मध्ये भेगा पडलेल्या आहे. उर्वरित १०० मी. लांबीमध्ये रस्ता सुस्थितीत आहे.सदर काम ग्रामपंचायत मनसर व्दारा करण्यात आले असल्याचा अहवाल कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, नागपूर यांनी ग्रामविकास व जलसंधारण विभागास पत्र क्र. जिपना/बांध/ का ४(१)/१७६/२०१६, दि. ०७.०१.२०१६ अन्वये सादर केला आहे.

---

### मुंडीपार सडक (ता.साकोली, जि.भंडारा) येथे भेल व सौरऊर्जा प्रकल्प सुरू करण्याबाबत

**(४) ९७४८ (०४-०४-२०१५). श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्हयातील साकोली तालुक्यातील मुंडीपार सडक येथे विदर्भातील महत्त्वाकांक्षी भेल व सौरऊर्जा प्रकल्प सुरू करण्यात आला असून त्याचे भूमीपूजन दिनांक १४ मे, २०१३ ला करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाकरिता संपादित केलेल्या जमिनमालकांना अद्याप मोबदला किंवा आश्वासनाप्रमाणे रोजगार देण्यात आले नसून प्रकल्पाचे काम अत्यंत मंद गतीने सुरू असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे ओ काय,
(३) असल्यास, परिसरातील बेरोजगारांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने तसेच संपादित झालेल्या जमीनमालकांना त्यांचा मोबदला मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) मे.भारत हेवी इलेक्ट्रीकल्स लिमिटेड यांच्या प्रकल्पासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम-१९६१ मधील तरतुदीनुसार भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे.शासनाने मंजूरी दिल्यानंतर उपविभागीय अधिकारी, साकोली यांना जमिनीच्या मोबदल्याची रक्कम रु.४६,४७,५४,६७५/- उपलब्ध करुन देण्यात आली असून उप विभागीय

अधिकारी, साकोली यांनी शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला वाटप केले आहे. जागेचा ताबा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत मे.भारत हेवी इलेक्ट्रीकल्स लिमिटेड यांना देण्यात आला आहे.

भेल कंपनीने महामंडळास दि. १/१०/२०१५ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी भंडारा, यांच्या अध्यक्षतेखाली दि. १४/०२/२०१३ रोजी नुकसान भरपाईचे दर ठरविण्यासंदर्भात झालेल्या बैठकीत रोजगार किंवा त्याऐवजी एक रकमी (one time compensation) नुकसान भरपाईची रक्कम घेण्यास संबंधीतांनी संमती दर्शविली होती. त्यानुसार कंपनीने त्यांना एक रकमी रक्कम अदा केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातुर नांदेड रस्त्यावर झालेल्या भिषण अपघातात एकाच कुटूंबातील ७ जणांचा मृत्यु झाल्याबाबत

**(५) ११४३५ (१०-०४-२०१५). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातुर-नांदेड रस्त्यावर झालेल्या भीषण अपघातात एकाच कुटूंबातील ७ जणांचा मृत्यु झाल्याचे दिनांक २६ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यावर मोठे मोठे खड्डे असल्यामुळे हे खड्डे बुजविण्याच्या प्रयत्नात हा अपघात झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण लवकरात लवकर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०२-२०१६) :**(१) होय. हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय. पोलीस खात्याच्या चौकशीनुसार सदरील अपघात हा वाहनचालकाच्या निष्काळजीपणामुळे झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

सद्यःस्थितीत सदर रस्त्याच्या कि.मी. ०/०० ते १९०/०० या लांबीतील खड्डे भरण्यात आले असून रस्ता सुस्थितीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दुष्काळग्रस्त भागातील ५० टक्के आणेवारीच्या आत असलेल्या शेतक-यांना कर्जवसुलीस स्थगिती न दिल्याबाबत**

**(६) १२३१९ (१०-०४-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दुष्काळग्रस्त भागातील शेतक-यांना जे गाव ५० टक्के आणेवारीच्या आत असेल त्या गावातील ज्या शेतक-यांनी बागायती पिक कर्ज घेतलेले आहे अशा कर्जवसुलीला स्थगिती नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे शेतक-यांवर १२ टक्के व्याजाचा बोजा पडणार आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, जळगाव जिल्ह्यात कोरडवाहू पिकांसाठी कर्ज घेतलेल्या शेतक-यांची संख्या नगण्य आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, यामुळे बरेचसे शेतकरी या निर्णयामुळे मिळणा-या लाभापासून वंचित राहतील, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, मुदतीत कर्ज न भरणाऱ्या शेतकऱ्यांना थकीत व्याज भरावे लागेल तथापि शासन निर्णयाप्रमाणे जे शेतकरी ५० पैश्यापेक्षा कमी अंतीम पैसेवारीमध्ये असतील व अशा शेतकऱ्यांनी रुपांतरणाचा लाभ घेतलेला नसल्यास सदर शेतकऱ्यांनाही १२ टक्के प्रमाणे व्याज भरावे लागेल ज्या शेतकऱ्यांनी रुपांतरण लाभ घेतला आहे अशा शेतकरी सभासदांनी घेतलेल्या कर्जाचे व्याज शासन निर्णयाप्रमाणे शासन भरणार आहे.
(३) नाही. जळगाव जिल्ह्यात कोरडवाहू सभासद ५५ टक्के आहे.
(४) नाही, हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्ह्यातील जामदा डाव्या कालव्यावरील व रहदारीचा प्रमुख मार्गावरील ७ पूल वाहतूकीच्या दृष्टीने धोकादायक असल्याबाबत**

**(७) १४२३१ (१०-०४-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्ह्यातील जामदा डाव्या कालव्यावरील व रहदारीचा प्रमुख मार्गावरील एकूण ७ पूल वाहतूकीच्या दृष्टीने धोकादायक झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर ७ पूलांच्या ठिकाणी सूचना फलक, संरक्षित कठडे, रिफ्लेक्टर्स इत्यादी नसल्यामुळे त्या ठिकाणी वारंवार अपघात होतात हे ही खरे आहे काय,

(३) तसेच या संदर्भात त्या भागातील लोकप्रतिनिधी व जनतेने मुख्य पाटबंधारे व सार्व. बांधकाम विभाग दोन्ही विभागाचे स्थानिक अधिकारी इत्यादीकडे अनेक वेळा निवेदने दिली आहेत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनावर कोणता निर्णय घेण्यात आला आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०२-२०१६) :**(१) होय. हे अंशतः खरे आहे.

जलसंपदा विभागाने बांधलेल्या कालव्यावरील पूल मानकानुसार आवश्यक असलेल्या रुंदीपेक्षा अरुंद आहेत. सदर पुलावरुन वाहतूक सुस्थितीत चालू आहे.

(२) हे खरे नाही.

सदर पुलांच्या ठिकाणी वाहतूक सुरक्षेबाबत आवश्यक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. तसेच आवश्यकतेनुसार सूचना फलक, संरक्षक कठडे उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

(३) व (४) प्रश्नाधीन रस्त्यावर जलसंपदा विभागने पादचारी क्रॉसिंगसाठी पूल बांधलेले आहेत. सदरचे बांधण्यात आलेले कॅनॉल स्ट्रक्चर मानकापेक्षा अरुंद असल्याने वाहतुकीस अडथळे निर्माण होतात. या संदर्भात मा. मंत्री (जलसंपदा) यांच्याकडे दि. ३०.१२.२०१४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ही कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात यावीत असा निर्णय झाला आहे. पुलाच्या रुंदीकरणाचे काम व इतर आवश्यक कामे मंजूरी, निधी निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

## मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत विशेष पॅकेजमधून औराद-तगरखेडा पूलाच्या बांधकामाबाबत

**(८) २०१८५ (३१-०७-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत विशेष पॅकेजमधून औराद-तगरखेडा पूलाच्या कामास सन २००८-२००९ साली १ कोटी ५५ लाख रुपये अंदाजित खर्चास मंजूरी देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १९७२ साली या पूलाचे सर्वप्रथम भूमीपूजीन होवून पायाभरणीनंतर काम पूर्णतः बंद पडल्यानंतर पुन्हा २००८-२००९ मये मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत मंजूरी मिळाल्यानंतर सदरहू काम सुरु होऊन मागील २ वर्षाहून अधिक कालावधीपासून अर्धवट स्थितीत बंद पडलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास औराद-तगरखेडा पूलाअभावी औदार, तगरखेडस, हालसी, तूगाव, आळवाई, मार्ग उदगीरसाठी जाणा-या ग्रामीण जनतेस अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू पूलाच्या उभारणीच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे व आतापर्यंत पूर्ण झालेल्या कामांवर एकूण किती रक्कम खर्च करण्यात आली आहे, तसेच सदरहू पूलाचे काम अर्धवट स्थितीत बंद असण्याची कारणे काय आहेत,

(५) औराद-तगरखेडा या पूलाचे अर्धवट स्थितीत बंद असलेले काम विनाविलंब हाती घेवून सदरहू पूल वाहतूकीसाठी तात्काळ कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०२-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

सदरील कामास मराठ़वाडा विकास कार्यक्रम २००८ अंतर्गत रु. २०० लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही. सद्य:स्थितीत पुलाअभावी औराद, तगरखेडा, हालसी, तुगाव आळवाई मार्गे उदगीर हे अंतर ५९ किमी असून पुलाचे बांधकाम झाल्यास हे अंतर ५७ किमी इतके होणार आहे.

(४) व (५) सद्यस्थितीत पुलाच्या एकूण १३ गाळयांपैकी ७ गाळे पूर्ण झाले असून त्यासाठी रु. ११८.६६ लक्ष इतका खर्च झालेला आहे.

संबंधित काम शासन व संबंधित कंत्राटदार यांच्या आवाक्याबाहेरील कारणामुळे रेंगाळले आहे. तथापि, सदरचे काम एप्रिल, २०१६ पर्यत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

## ठाणे शहरातील कापूरबावडी उड्डाणपुलाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(९) २६१२८ (११-०८-२०१५). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एमएमआरडीए मार्फत हाती घेण्यात आलेल्या ठाणे शहरातील कापूरबावडी उड्डाणपुलाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याने सदर पुलास तडे गेल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एका समिती गठीत करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री यांचेकडे पत्राव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने दोषी अधिका-यावंर कोणती कारवाई केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०६-२०१६) :**(१) नाही.

(२) होय.

(३) या प्रकरणी चौकशी करण्यासाठी श्री.एस.आर.तांबे, निवृत्त सचिव, सा.बां.विभाग यांची एक सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली होती. चौकशी समितीचा तांत्रिक तपासणी अहवाल प्राप्त झाला असून त्यात सदर उड्डाणपूल वाहतुकीस सुरक्षित असल्याचे नमूद करण्यात आले

आहे. त्यानुसार पूल वाहतुकीस १८.०८.२०१५ रोजी खुला करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यावल (जि.जळगाव) मनवेल येथील उज्वल शिक्षण संस्थेच्या आदिवासी आश्रमशाळेत शासकीय अनुदानात अपहार झाल्याबाबत**

**(१०) २८२१८ (३१-१०-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यावल (जि.जळगाव) मनवेल येथील उज्वल शिक्षण संस्थेच्या आदिवासी आश्रमशाळेत शासकीय अनुदानातील ४६ लाख निधीचा अपहार झाल्याप्रकरणी संचालकाविरुध्द न्यायालयाच्या आदेशाने फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला असल्याचे दिनांक ३ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाचे ४६ लाख ७ हजार ८९८ रुपये शाळेसाठी खर्च न करता संस्थेचे अध्यक्ष व अन्य संचालकांनी स्वत:साठी खर्च केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी दोषी व्यक्तींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच अशा प्रकारच्या घटना भविष्यात घडू नये म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. विष्णु सवरा (०३-०२-२०१६) :**(१) स्थानिक पोलिस स्टेशन यावल, जि.जळगाव येथे मा.प्रथम वर्ग न्यायाधिश, यावल यांचे दिनांक २३/०७/२०१५ चे आदेशान्वये गुन्हा नोंद झालेला आहे.
(२) सदर प्रकरण हे न्यायप्रविष्ठ असून पोलीस यंत्रणेकडून तपास सुरु आहे. तथापि संस्थेकडून खुलासा प्राप्त झालेला असून ज्या उद्देशासाठी अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे. त्याच उद्देशासाठी अनुदान खर्च केल्याचे नमूद केले आहे.
(३) व (४) दोषी व्यक्तीविरुध्द पोलीस यंत्रणेमार्फत चौकशी करण्यात येत आहे. चौकशी अंती दोषी व्यक्तीविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल.

---

**मुंबई-पुणे एक्सप्रेस महामार्गावर पथकर वसुलीमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(११) २८५२१ (२२-१२-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भिमराव तापकीर**

**(खडकवासला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे एक्सप्रेस महामार्गावर तासाला फक्त ५५ वाहने प्रवास करीत असल्याची खोटी माहीती आयआरबी या कंत्राटदार कंपनीने देवून टोलच्या माध्यमातून २००४ ते २०१९ या कालावधीत २८६९ कोटी वसूल करण्याची परवानगी दिली असताना २३०६ कोटी रुपये वसूल झाले असल्याची माहिती राज्य रस्ते विकास महामंडळाने त्यांच्या वेबसाईटवर प्रसिद्ध केली, हे खरे आहे काय,

(२) तसेच, दिनांक २३ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास, राज्याचे माहिती आयुक्त रत्नाकर गायकवाड यांच्या आदेशामुळे उघडकीस आल्यानुसार जुन्या पुणे मुंबई महामार्गावर टोल वसुल करणा-या आयआरबी कंपनीला एमएसआरडीसी ने निर्धारित १ हजार ४६१ कोटी रुपयांचा टोल वसुलीसाटी २०१९ पर्यंत परवानगी देण्यात आली असताना, सन २००६-२०१५ दरम्यान कंपनीने १ हजार ९३ कोटींची वसुली केली असून उर्वरित ३६८ कोटी रुपये आगामी दोन वर्षात म्हणजेच २०१७ पर्यत वसुल होऊ शकतील, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयआरबी कंपनीशी शासनाने केलेल्या करारातील सर्व अटी व शर्ती कोणत्या तसेच या अटी व शर्तीचे पालन व सध्या या दोन्ही महामार्गावरुन जाणाऱ्या वाहनांची संख्या व प्रतिदीन वसुल होणारा टोल यावरुन शिल्लक रक्कम वसुल होण्यास अंदाजे किती कालावधी लागेल,

(४) असल्यास, सदर दोन्ही महामार्गावरील टोल बंद करण्याबाबत शासनाचे धोरण आहे काय ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर कामाबाबतच्या स्विकृत निविदेुसार उद्योजकाने रु.९१८ कोटी रुपये अपफ्रंट किंमत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास अदा केली आहे. त्यापोटी उद्योजकास टोल द्वारे मिळणारे उत्पन्नाबाबतचे पूर्ण अधिकार दिनांक ८ ऑगस्ट, २०१९ पर्यंत देण्यात आले आहेत.

(४) अतिरिक्त मुख्य सचिव, (सा.बां.) यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई प्रवेश नाके व मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील पथकर नाक्यांवर हलक्या वाहनांना पथकरातून सूट देण्यासंबंधी आर्थिक व कायदेशीर बाबींची सुसाध्यता तपासण्याबाबत समिती स्थापन करण्यात आली आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

---

## पुणे-बंगळूर महामार्गावरील अंबप (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) फाट्यावर उड्डाणपुल बांधण्याबाबत

**(१२) २९०६६ (२३-१२-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-बंगळूर महामार्गावरील अंबप (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथे फाट्यावर उड्डाणपुलाची मागणी गेली अनेक वर्षे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) गेल्या वर्षभरात याठिकाणी झालेल्या अपघातांमध्ये १७ जणांना आपले प्राण गमवावे लागले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन सदर उड्डाणपूल बांधणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०२-२०१६) :** (१) पुणे - बंगळूर महामार्गावरील सातारा ते कागल या लांबीच्या चौपदरीकरणाच्या कामाचे सवलतकार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ हे असून त्यांच्याकडे या प्रकारचे कोणतेही निवेदन प्राप्त झालेली नाही तथापी दै. पुढारी या दैनिकाच्या दि. २७/०८/२०१५ रोजीच्या व दै. लोकमत या दैनिकाच्या दि. १०/११/२०१५ ला प्रकाशित आवृतीमध्ये अशा आशयाची बातमी आल्याची कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ पुणे यांनी कळविले आहे.

(२) पुणे-बेंगलोर महामार्गावरील अंबप या जंक्शनवर सन -२०१५ मध्ये एकूण ११ अपघांतामध्ये ३ व्यक्ती मृत्यूमुखी पडल्या असुन ७ व्यक्ती जखमी झाल्याचे पोलीस निरीक्षक वडगाव पोलीस ठाणे यांनी कळविले आहे.

(३) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत पुणे-बेंगलोर महामार्गाच्या प्रस्तावित सहापदीकरणाच्या प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) मध्ये उड्डाणपूल बांधण्याची बाब समाविष्ट करण्यात येत असल्याचे कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ पुणे यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील आदिवासी समाज विकासापासून वंचित असल्याबाबत

**(१३) ३०१२६ (२२-१२-२०१५). श्री.विजय औटी (पारनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासींसाठी गेल्या ३० वर्षात सुमारे ३२ हजार कोटी रु. खर्च करुनही हा समाज विकासापासून वंचित असल्याची माहिती माहे ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत ८१.११% आदिवासी समाज दारिद्र्य रेषेखाली, ४३.२५% भूमिहीन, ५०% मुले कुपोषित असून दरवर्षी सुमारे ६००० बालके ही कुपोषणाने मृत्यूमुखी पडतात. तसेच अर्भक मृत्यूचे प्रमाण ७३% असून ६७% महिलांना ॲनेमियाचा आजार असल्याची माहिती उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासींच्या विकासासाठी असलेल्या आदिवासी विकास विभागात सुमारे ५ हजार पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, आदिवासींच्या अभ्यासासाठी शासनाने नियुक्त केलेल्या डॉ. विजय केळकर समितीचा अहवाल अद्याप  सादर करण्यात आला नसल्याचे उघडकीस आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने याप्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले आणि हजारो कोटी रुपये खर्च करुन त्यांचा विकास न होण्याची कारणे कोणती ?

**श्री. विष्णु सवरा (०७-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) राज्यातील आदिवासी कार्यक्षेत्रात सन २०१४-१५ अखेर ० ते ६ वर्ष वयोगटातील ४१८६ बालके मृत्यूमुखी पडलेली आहेत. सदरचे अर्भक व बालमृत्यू हे कमी वजनाचे बालक, कमी दिवसांची प्रसुती, अँसपेक्शिया, सेप्टीसिनिया इ. वैद्यकीय कारणाने व आजाराने झालेले आहेत तसेच सन २०१४-१५ अखरे आदिवासी कार्यक्षेत्रात ६७% गरोदर मातांना रक्तक्षय असल्याचे आढळून आले आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.
(५) यासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाकडून आवश्यक ती खबरदारी घेण्यात येत आहे. या विभागामार्फत स्तनदा व गरोदर महिलांकरीता तसेच पाच वर्षाखालील मुलांकरीता डॉ.अे.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना तर आश्रमशाळेतील मुलांकरिता अंडी, केळी वाटप योजना सन २०१६ पासून सुरु करण्यात आली आहे तसेच आदिवासी समाज विकासापासून वंचित राहू नये यासाठी शासनाच्या वेगवेगळया विभागांमार्फत विविध योजना राबविण्यात येऊन त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्यात येत आहे. योजना लाभार्थ्यांना पोहोचण्याकरिता विविध पर्यायांचाही वापर केला जात आहे.

---

**हिंगोली जिल्हयातील आखाडा बाळापूर येथील शेवाळा रोड ते बाळापूर**
**या रस्त्याची अतिशय दुरावस्था झाली असल्याबाबत**

**(१४) ३०३०६ (२२-१२-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आखाडा बाळापूर (जि.हिंगोली) येथील शेवाळा रोड ते बाळापूर या रस्त्यांची अतिशय दुरावस्था झाली असल्यामुळे वाहतुकीस अनेक अडचणी निर्माण होत असल्यामुळे वाहतुकीची मोठ्या प्रमाणात कोंडी होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्यांची त्वरीत दुरुस्ती करण्याबाबत तसेच रस्त्यांच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणा-या संबंधित दोषी विभागावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०२-२०१६)** :(१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३)

खराब रस्ता लांबीतील सुधारणेचे रु. १३१.४२ लक्ष रकमेचे काम नाबार्ड -२० योजनेमध्ये मंजूर असून सद्य:स्थितीत काम प्रगतीत आहे.

---

**राज्यातील आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्याचा प्रवास खर्च परवडत नसल्याबाबत**

**(१५) ३०३१७ (२२-१२-२०१५). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्याचा प्रवास खर्च परवडत नसल्याने विद्यार्थ्यांचे शाळेतील गळतीचे प्रमाण वाढले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या तिस-या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार आदिवासी विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण कमी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१०-०६-२०१६)** :(१) हे खरे नाही.

आदिवासी विकास विभागामार्फत सुरु असलेल्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळा या निवासी स्वरुपाच्या आहेत. प्रत्येक इयत्तेमध्ये ५० विद्यार्थी मंजूर क्षमतेपैकी ४० विद्यार्थी निवासी तर १० विद्यार्थी हे बहिस्थ असतात. आश्रमशाळेत निवासी विद्यार्थी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून ते पूर्ण होईपर्यंत आश्रमशाळेत निवासी असतात. त्यामुळे प्रवेशित विद्यार्थ्यांना शाळेत जाण्याचा प्रवासखर्च परवडत नसल्याचे विद्यार्थ्यांचे शाळेतील गळतीचे प्रमाण वाढले अशी बाब निदर्शनास आली नाही. तसेच शासन मान्य शाळा आणि स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यानांही पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना सुरु केलेली आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मंत्रालयात अग्निशमन कर्मचारी नियुक्ती करण्याबाबत

**(१६) ३०८९७ (२१-०१-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंत्रालयात अग्निसुरक्षेसाठी केवळ एकच कर्मचारी कार्यरत असल्याचे दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन ४३ अग्निशमन कर्मचारी नियुक्त करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने मुख्य सचिवांकडे पाठविलेला प्रस्ताव प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंत्रालयाला लागलेल्या आगीची दखल घेऊन शासनाने मंत्रालयात आवश्यक असणारे अग्निशमन कर्मचारी नियुक्ती करण्याबाबत तसेच मंत्रालयातील अग्निसुरक्षेतेसाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-०३-२०१६) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) मंत्रालय इमारतीच्या अग्निसुरक्षेसाठी १ अग्निसुरक्षा अधिकारी, ४ प्रमुख अग्निशामक विमोचक, २ अग्निशमक विमोचक तसेच मुंबई अग्निशमक दलाचे फायर इंजिन, वॉटर टँकर व रुग्णवाहिका या ३ वाहनांवरील वाहनचालकांसह प्रत्येक पाळीत १२ कर्मचारी याप्रमाणे ३ पाळयांमध्ये ३६ कर्मचारी कार्यरत आहेत.

असे एकूण ४३ कर्मचारी अग्निसुरक्षेसाठी मंत्रालयात तैनात आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अहमदनगर येथील नगर-सोलापूर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(१७) ३११३८ (२२-१२-२०१५). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर येथील नगर-सोलापूर रस्त्यावरील वाळूंज शिवारातील खड्डयात मोटार सायकल आदळून कंटेनरखाली सापडल्याने एका कुटुंबातील तिघांचा बळी गेला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यावर लष्कर हद्द संपल्यानुतर तुक्कड ओढा पासून मिरजगावापर्यंत जागोजागी अवजड वाहतुकीमुळे खड्डे पडले असल्याने सतत अपघात होत असतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर रस्त्याच्या प्रश्नाधीन लांबीत, त्या लांबीचे नुतनीकरण ६ वर्षापूर्वी पूर्ण होऊन सदरची लांबी नूतनीकरणाला आली असल्याने व रस्त्यावर मोठया प्रमाणात अवजड वाहतूक असल्याने वर्षभर खड्डे पडतात. त्यामुळे वाहतुकीचा वेग मंदावतो व काही ठिकाणी खड्डयामध्ये मोटारसायकल चालक जास्त गतीने गेल्यास अपघाताची शक्यता असते व सदर लांबीत काही ठिकाणी असे प्रकार घडल्याचे दिसून येते.

(३) सदर रस्त्यावर पडलेले खड्डे हे शासनामार्फत वेळोवेळी भरण्यात येऊन रस्त्याची डागडुजी केलेली आहे व रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आला आहे. किमी ७/००० ते ७/७०० व ९/५०० ते १०/५०० मधील लांबी नुतनीकरणास आल्याने अतिशय खराब झाली असल्याने त्याचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे, ही कामे मंजूरी, निधी निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेवून पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील लिंगनूर क नेसरी ते हेब्बाळ-जळद्याळ आणि जांभूळवाडी-लिंगनूर क (ता.गडहिंग्लज) नेसरी ग्रामीण मार्गाचा सन २०१५-२०१६ च्या पुरवणी अर्थसंकल्पात समावेश करण्याबाबत**

**(१८) ३२५६९ (२२-०१-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील लिंगनूर क नेसरी ते हेब्बाळ-जळद्याळ आणि जांभूळवाडी-लिंगनूर क (ता.गडहिंग्लज) नेसरी ग्रामीण मार्गाचा सन २०१५-२०१६ च्या पुरवणी अर्थसंकल्पात या रस्त्याचा समावेश करण्याबाबत व निधीची तरतूदीची मागणी मा.सहकार व सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनीधींनी दिनांक ९ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०७-२०१६) :**(१) होय.

(२) प्रश्न भाग १ मध्ये खालील दोन रस्त्यांचा समावेश आहे.

१) लिंगनूर क ते नेसरी हेब्बाह जळद्याळ- हा रस्ता प्रजिमा ६३ असून, त्याची लांबी २२ कि.मी. आहे. रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आहे. लिंगपूर क ते नेसरी हेब्बाह जळद्याळ या भागातील लांबी ३.५० कि.मी. आहे. या भागातील रस्त्याचा डांबरी पृष्ठभाग क्षतिग्रस्त झाला आहे. सदर लांबीतील दुरस्तीचे काम मंजूरी निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

२) जांभूळवाडी ते लिंगनूर कसबा, नेसरी- हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र. २९ आहे. रस्त्याची लांबी ३.२०० कि.मी. आहे. या लांबीपैकी २.२०० कि.मी. मधील रस्त्यांचा डांबरी पृष्ठभाग क्षतिग्रस्त झालेला आहे. रस्त्याच्या डांबरीपृष्ठ भागाचे नुतनीकरण व काम मंजूरी निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**सावदे ते रिंगणगाव (ता.एरंडोल, जि.जळगांव) या रस्त्याचे**
**काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(१९) ३२९४० (२२-१२-२०१५). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :- (१) सावदे ते रिंगणगाव (ता.एरंडोल, जि.जळगांव) या रस्त्याचे काम (प्र.जि.मा.३२) अतिशय निकृष्ट दर्जाचे होऊन यामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्‍नुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) विषयाधीन लांबीपैकी कि.मी. ७/००ते ८/०० या रस्ते लांबीतील काम नाबार्ड-१८ मधून सन २०१३ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. सदर कामावर वापरण्यात आलेले बांधकाम साहित्य विहीत मापदंडानुसार असल्याचे दक्षता व गुणनियंत्रण मंडळाने केलेल्या तपासणीत दिसून आले आहे.

उर्वरित लांबीतील रस्ते पृष्ठभाग वाहतुकीस योग्य आहे.

---

**हिंगोली जिल्ह्यातील सवना येथील पुलाचे बांधकाम**
**अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत**

**(२०) ३३१०३ (२२-१२-२०१६). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यातील सोनगाव तालुक्यातील येलदरी-सेनगाव-फाळेगाव या रस्त्यावरील सवना व वायचाळ पिंपरी या गावाजवळील पुलांची कामे मंजूर असूनही अनेक वर्षापासून अर्धवट अवस्थेत असल्यामुळे या पुलावर अनेक अपघात होऊन वाहनचालक मृत्यूमुखी पडत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पुलांची कामे मंजूर असूनही अर्धवट असल्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर पुलांची कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाकडून काय कार्यवाही करण्यात येईल व निश्चित किती कालावधीत कामे पूर्ण करण्यात येतील,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०२-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) पुरेशा निधीअभावी व कंत्राटदाराच्या अनियमिततेमुळे विहीत मुदतीत पुलाचे काम पूर्ण होऊ न शकल्याने कंत्राटदाराकडून निविदा अटी व शर्तीनुसार सदर काम काढून घेऊन नव्याने निविदा मागवून मार्च, २०१७ पर्यत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**अहमदनगर जिल्हयातील नगर-दौंड रस्त्याची मोठया प्रमाणात दुरावस्था झाली असलेबाबत**

**(२१) ३४४७२ (२३-१२-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हयातील नगर-दौंड रस्त्याची मोठया प्रमाणात दुरावस्था झाली असल्याचे माहे मे, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर रस्त्याची दुरूस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०२-२०१६)** :(१) अंशत: खरे आहे.
(२) होय. क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी पाहणी केली आहे.
(३) व (४) प्रश्नाधीन रस्त्यावरील खड्डे भरुन रस्ता वाहतुकीयोग्य करण्यात आला आहे.

या रस्त्याच्या ५.७० कि.मी. लांबीतील मजबूतीकरण व डांबरीकरणाची रु.२०१ लक्ष रकमेची कामे पुर्ण झाली आहेत व डांबरीकरणाची रु.१३.५०० कि.मी. लांबीतील मजबूतीकरण व डांबरीकरणाची रु. ६६४.०० लक्ष रकमेची कामे प्रगतीपथावर आहेत.

रस्त्यासाठी इतर आवश्यक दुरुस्तीची कामे मंजूरी, निधी निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**नांदेड जिल्हयातील मुखेड तालुक्यात राजूरा ते भायेगांव रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(२२) ३४५२८ (२२-१२-२०१५). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील मुखेड तालुक्यात राजूरा ते भायेगांव मार्गे देगलुर, हरग्याळ, गोणेगांव, राजूरा ते जाहूर मार्गे बा-हाळी, तडग्वेल मार्गे देगलुरे या मार्गावर खड्डेच खड्डे झाल्याने प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०२-२०१६) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे,
(२) व (३) प्रश्नाधीन रस्त्यांवर अर्थसंकल्पातून ३ कामे मंजूर असून सदर कामे प्रगतीत आहेत व रस्ते सुस्थितीत ठेवण्यासाठी योजनेतर कार्यक्रमांतर्गत निधी उपलब्धतेनुसार रस्ता दुरुस्तीची कामे करण्यात येत आहेत.

---

### अदमपूर-बिलोली-कुंडलवाडी-धर्माबाद (जि.नांदेड) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(२३) ३४९५० (२३-१२-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयातील महाराष्ट्र राज्य महामार्ग क्र.४२७ अदमपूर बिलोली कुंडलवाडी धर्माबाद रस्ता एक महिन्याच्या आत तातडीने दुरुस्त करा अन्यथा सामूहिक आत्मदहन करु अशा प्रकारचा इशारा लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता, नांदेड यांना लेखी निवेदनात दिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०२-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर रस्त्याचे दुरुस्तीचे काम प्रगतीत आहे. तसेच सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात या रस्त्यावर एकूण ५ कामे मंजूर असून एक काम प्रगतीत आहे. कामाच्या प्राधान्यानुसार व निधी उपलब्धतेनुसार ही कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यमार्ग टेंभुर्णी ते जातेगांव (अहमदनगर) या रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम अपूर्ण असल्याने वारंवार अपघात होत असलेबाबत**

**(२४) ३५२९५ (२३-१२-२०१५). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापुर जिल्ह्यातुन जाणा-या राज्यमार्ग टेंभुर्णी ते जातेगांव (अहमदनगर) रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम सुप्रिम कंपनीने गेल्या वर्षभरापासुन थांबविलेले असल्याने व रस्त्यात खड्डे पडल्याने रस्ता दुभाजकाच्या दोन्ही बाजुंनी मुरुम टाकल्यामुळे रस्ता अरुंद झाल्याने वर्षभरात १२ अपघातात २४ जण मरण पावले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार सदर रस्त्याचे काम ठेकेदाराने थांबविल्याप्रकरणी सदर ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०३-२०१६) :**(१) अंशतः खरे आहे. भूसंपादना अभावी रस्त्याचे कामास विलंब होत आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगवी बु. ते भालोद, भालोद ते बामणोद (ता.यावल, जि.जळगाव) येथील रस्त्याची झालेली दुरावस्था**

**(२५) ३६०७८ (२२-१२-२०१५). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगवी बु. ते भालोद, भालोद ते बामणोद (ता.यावल, जि.जळगाव) येथील रस्त्याची मोठया प्रमाणात दुरावस्था झाली असून मोठया प्रमाणात अपघात घडत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०२-२०१६) :**(१) हे अंशतः खरे आहे.

(२) व (३) सांगवी-भालोद-बामणोद कि.मी. १९/०० ते २७/५०० ही लांबी काळ्या मातीच्या केळीच्या बागायती क्षेत्रातून जाते. या रस्त्यावरुन जड वाहनाची वाहतूक होत असल्याने रस्ता काही ठिकाणी क्षतीग्रस्त झाला. या भागात आवश्यक दुरुस्ती करण्यात आली आहे. रस्त्यावरील खड्डे डांबरमिश्रीत खडीने भरण्यात आले आहेत. रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे.

---

**पुणे शहरातील तळेगाव दाभाडे-चाकण-शिक्रापूर-न्हावरे-यवत-चौफुला या रस्त्याचे चौपदरीकरणाबाबत**

**(२६) ३६६१२ (२२-१२-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील तळेगाव दाभाडे-चाकण-शिक्रापूर-न्हावरे-यवत-चौफुला या रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम होवू शकले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रगतीपथावर असलेले भूसंपादनाचे काम पूर्ण करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करत आहे,

(३) असल्यास, भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी किती कालावधी अपेक्षित आहे,

(४) प्रगतीपथावर असलेले भूसंपादनाचे काम पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०३-२०१६) :**(१) होय.

(२), (३) व (४) तळेगाव-दाभाळ-चाकण-शिक्रापूर-न्हावरे-यवत-चौफुला या लांबीतील रस्त्याचे तळेगांव-चाकण, चाकण-शिक्रापूर व शिक्रापूर-न्हावरा असे भाग असून तळेगांव-चाकण या प्रकल्पाचा सुधारित सुसाध्यता अहवाल तयार करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. तसेच चाकण-शिक्रापूर व शिक्रापूर न्हावरा या भागामध्ये भूसंपादनाची कार्यवाही नवीन भूसंपादन कायदा दि.२६.५.२०१५ व महसूल व वन विभागाच्या शास न निर्णय दि. १२.०५.०१५ नूसार प्रगतीपथावर आहे. भूसंपादनाची प्रक्रिया वर्षभरात पूर्ण करावयाचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगणी-टाफळणी (ता.आष्टी, जि.बीड) या दोन गावांमधील पुलाचे बांधकामाबाबत**

**(२७) ३८९०८ (१३-०१-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणी-टाफळणी (ता.आष्टी, जि.बीड) या दोन गावांमधील पुलाचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांकडून केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, सदर पुलाचे बांधकाम पूर्ण होण्याकरिता शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) प्रश्नाधीन पुलाचे काम कंत्राटदाराने सुरु केले नाही. त्यामुळे कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करुन सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात आली.

सदर काम मंजूरीनंतर ५ वर्षात पूर्ण न झाल्याने अर्थसंकल्पातून वगळले गेले.

प्रश्नाधीन काम नव्याने अर्थसंकल्पित करुन नाबार्ड अथवा अन्य योजनेअंतर्गत करण्याचे नियोजन आहे.

---

## चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही येथे मुलांच्या व मुलींच्या वसतीगृहाच्या बाधंकामास निधी मिळण्याबाबत

**(२८) ३९७९६ (२९-०४-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही येथे आदिवासी विकास विभागाच्या वतीने अनुसूचित जमातीच्या मुलांसाठी ३ कोटी ६२ लक्ष ६६ हजार रूपये अंदाजपत्रकास प्र.मा.क्र. आवषा-२०१४/प्र.क्र.२५/का-१२ दिनांक १७ मार्च, २०१५ आणि अनुसूचित जमातीच्या मुलींसाठी ३ कोटी ९ लक्ष १२ हजार रूपये अंदाजपत्रकास प्र.मा.क्र. आवगृ-२०१४/प्र.क्र.२५/का-१२ दिनांक १७ मार्च, २०१५ नुसार प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर सुध्दा अद्यापही सदर दोन्ही वसतीगृहाच्या बांधकामास निधी प्राप्त झाला नसल्याची माहिती दिनांक २५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन्ही वसतीगृहाच्या इमारतीचे बांधकाम करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबतचे लेखी निवेदन लोकप्रतिनिधीनी आदिवासी विकास मंत्री यांना पत्र क्र.विव/ब्रम्ह/१०१३/२०१६ दिनांक १२/०१/२०१६ रोजी आणि सचिव, आदिवासी विकास विभाग यांना पत्र क्र.विव/ब्रम्ह/१०१७/२०१६ दिनांक १३/०१/२०१६ रोजी दिले,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दोन्ही वसतीगृहाच्या इमारतीचे बांधकाम करण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करून दिला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२९-०६-२०१६) :**(१) व (२) हे खरे आहे.

(३) मार्च, २०१६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सदर दोन्ही वसतीगृहाच्या इमारत बांधकामासाठी सन २०१६-१७ या वर्षासाठी प्रत्येकी रु. १२५.०० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र जनजातीच्या व्यक्तींची आर्थिक स्थिती (सुधारणे) अधिनियम १९७६ च्या एकाधिकार खरेदीबाबत

**(२९) ४०३०३ (२९-०४-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र जनजातीच्या व्यक्तींची आर्थिक स्थिती (सुधारणे) अधिनियम १९७६ ची एकाधिकार खरेदी योजना एकुण २९ जिल्हयामध्ये कार्यरत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी क्षेत्रातील कृषी उपज वस्तू आदिवासी नागरीकांकडून एकाधिकार खरेदी योजनेतंर्गत विकत घेतल्या जातात, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासींचे कृषी उपज वस्तू स्पर्धात्मक मुल्यभावांनी एकाधिकार खरेदी योजनेतंर्गत विकल्याने आदिवास्यांच्या मालांना भाव मिळत नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, आदिवास्यांचे कृषी उपज वस्तू इतर कृषी उत्पन्न बाजार समित्यामध्ये विकण्यास मनाई आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, आदिवास्यांचे कृषी उपज वस्तू स्पर्धात्मक बाजार समित्यांमध्ये विकण्यास शासनाची योजना आहे काय, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. विष्णु सवरा (२०-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) हे खरे आहे.

तथापि, एकाधिकार योजनेत नजिकच्या कृषी उत्पन्न समिती मधील प्रचलित बाजारभावाचा आधार घेवून शासन निर्देशानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने वस्तुंची खरेदी दर ठरविण्यात येवुन अशा दरानुसारच एकाधिकार योजनेत शेतकऱ्यांकडुन कृषी उपज वस्तुंची खरेदी केली जाते. महाराष्ट्र जनजातीच्या व्यक्तिंची आर्थिक स्थिती (सुधारणे) अधिनियम १९७६ च्या कलम ५ (अ) नुसारच आदिवासींच्या कृषी उपज वस्तुंची खरेदी केली जाते.

---

## औंढा नागनाथ (जि. हिंगोली) तालुक्यातील देवाळा फाटा-अंजनवाडा-सिध्देश्वर रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(३०) ४१३२६ (०४-०५-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औंढा नागनाथ (जि. हिंगोली) तालुक्यातील देवाळा फाटा - अंजनवाडा - सिध्देश्वर मार्गे रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०६-२०१६)** :(१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) प्रश्नाधीन रस्ता हा रस्ते विकास योजना २००१-२१ नुसार प्रजिमा-२१ असून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जिल्हा परिषदेकडून सन २०१४ मध्ये हस्तांतरीत झाल्यानंतर सन २०१४-१५ मध्ये २.०८ किमी चे डांबरीकरणाचे काम पुर्ण झाले असून नळकांडी पुलाचे काम प्रगतीपथावर आहे.

प्रश्नाधीन रस्त्यावर उर्वरित लांबीत खड्डे भरण्यात आले आहेत.रस्ता सुस्थितीत असून वाहतूक सुरळीत चालू आहे.

---

**नवी मुंबईतील पनवेल-सायन महामार्गावर खांदेश्वर येथे बेकायदा कलिंगड व रोपे विक्रेत्यांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३१) ४२००० (२९-०४-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील पनवेल-सायन महामार्गावर खांदेश्वर येथे बेकायदा कलिंगड नाका व रोपवाटीका हटविण्याची तयारी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सुरु केले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील कलिंगड विक्रेत्यांना व रोपे विकणाऱ्यांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०६-२०१६)** :(१) होय.

(२) सदर विक्रेत्यांनी राष्ट्रीय महामार्ग क्र.४ च्या हद्दीत बेकायदा अतिक्रमण केले असल्याने त्यांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देता येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई व पुणे या मार्गावरील वाढत असलेले अपघात रोखण्याबाबत व अपघातात मृत्यू पावलेल्या कुटुंबाला व जखमींना आर्थिक मदत मिळण्याबाबत**

**(३२) ४२३७५ (२९-०४-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व पुणे या दोन शहरांना जोडणारे प्रमुख दोन मार्ग धोकादायक बनत चालले असून सन २०१५ मध्ये या मार्गावर ३३९ हून अधिक अपघात होऊन १३६ हून अधिक गंभीर जखमी होऊन ते अपंग झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मार्गावर सध्या वाढत असलेले अपघात रोखण्याबाबत व अपघातात मृत्यू पावलेल्या कुटुंबाला व जखमींना आर्थिक मदत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०६-२०१६) :**(१) होय.
(२) सर्वसाधारणपणे वाहनचालक ओव्हरस्पिड, ओव्हरटेकिंग करत असल्यामुळे अपघात होतात. अपघात रोखण्यासाठी सुमारे १४ कि.मी. लांबीत हायटेन्साईल वायर रोप चे (ब्रायफेन वायर रोप) क्रॅश बॅरीयर माहे जून, २०१४ मध्ये बसविण्यात आले आहे. अपघातप्रवण लांबीमध्ये (२५ कि.मी.) हायटेन्साईल वायर रोप क्रॅश बॅरीअर बसविण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. तसेच घाटाच्या लांबीत दरडी कोसळून होणारे अपघात रोखण्यासाठी अँकर बोल्टिंग सह वायर रोप लावण्याचे काम प्रगतीत आहे. तसेच ओव्हरस्पीड होऊ नये यासाठी वाहतूक पोलिसांकडून स्पिडगनद्वारे गती नियमित करुन अपघात रोखण्याचे प्रयत्न करण्यात येत आहे.

जे.पी.रिसर्च इंडिया प्रा.लि. या संस्थेकडून द्रुतगती मार्गावरील अपघात रोखण्यासाठी सर्व्हेक्षण करुन तसा अहवाल पोलिसांकडून घेण्यात आला आहे. दि.२३.०२.२०१६ रोजी सेव्ह लाईफ फाऊंडेशन, महिंद्रा ॲन्ड महिंद्रा व मरारविम (मर्या.) यांचे समवेत द्रुतगती मार्ग “झिरो फॅटिलिटी” कॉरिडॉर करण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे.

जे अपघात मानवी चुकांमुळे व वाहनातील तांत्रिक बिघाडामुळे होतात त्यांना शासन निर्णयाप्रमाणे त्याची नुकसान भरपाई लागू होत नाही. खालापूर तालुक्याच्या हद्दीतील मौजे आडोशी तालुका खालापूर मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर दिनांक १९.०७.२०१५ रोजी १२.०० वाजण्याच्या दरम्यान दरड कोसळून झालेल्या अपघातात मृत्यू पावलेल्या ४ व्यक्तींना शासनामार्फत प्रत्येकी चार लाख रुपये मदत देण्यात आली आहे व जखमींसाठीच्या उपचाराचा खर्चही करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील प्रवेश मार्गासह पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील टोल रद्द करण्याबाबत**

**(३३) ४२७२० (२९-०४-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.विलास तरे (बोईसर),**

**श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे दहा ठिकाणी टोल आकारणी सुरु असून ती रद्द करण्याचा शासनाचा विचार असून त्यासाठी मुंबईतील प्रवेश मार्गासह पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील टोल रद्द करण्याबाबत शासनास शिफारशी करण्यासाठी समिती नेमण्यात आलेली आहे व समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समितीची रचना, कार्यकक्षा व कालावधी काय आहे,

(३) उक्त समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय, असल्यास अहवालाचे स्वरुप काय आहे व त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०६-२०१६) :**(१) होय, अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) मुंबई प्रवेशद्वारावरील पथकर नाके आणि मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग या दोन ठिकाणच्या पथकर नाक्यांवर हलक्या वाहनांना सूट देण्याबाबत वित्तीय व कायदेशीर बाबी तसेच सुसाध्यता तपासून अहवाल सादर करण्यासाठी अतिरिक्त मुख्य सचिव (सा.बां.) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीने आपला अहवाल सादर केला असून सदर अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**ठाणे जिल्ह्यातील आदिवासी विकास महामंडळाकडून भात खरेदी केंद्रे सुरु करणेबाबत**

**(३४) ४२८२४ (२९-०४-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील भात खरेदी केंद्रे बंद पडली असुन शेतक-यांना नाईलाजाने खाजगी व्यापा-यांना कमी भावाने भात विकावा लागत आहे, त्यामुळे शेतक-यांचे आर्थिक नुकसान होत आहे. या गंभीर समस्येकडे आदिवासी विकास महामंडळ तसेच मार्केटिंग फेडरेशनने दुर्लक्ष केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त बाबीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, भात खरेदी केंद्रे सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२०-०६-२०१६)** :(१) हे खरे नाही.
शासन निर्णय दि. ३१ ऑक्टोबर २०१५ अन्वये खरीप हंगामातील आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत हमी दराने धान खरेदीची मुदत दि. १ नोव्हेंबर २०१५ ते ३१ मार्च, २०१६ अशी असून ठाणे जिल्हयात दि. ३१ मार्च २०१६ अखेर एकुण मंजूर ८ खरेदी केंद्रांवर २९८० शेतकऱ्यांकडून साधारण ७८०११.९७ क्विंटल धान प्रोत्साहनपर राशीसह एकूण रक्कम रु. १२.५६ कोटी इतक्या किंमतीची खरेदी महामंडळाकडुन करण्यात आली आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) दि. ३१ ऑक्टोबर २०१५ चा शासन निर्णयान्ये खरीप पणन हंगामातील उत्पादित धानाची हमीभावाने खरेदीची मुदत दि. ३१ मार्च २०१६ पर्यत असल्याने त्यानुसार ठाणे जिल्हयात वर नमुद केल्याप्रमाणे धानाची खरेदी शेतकऱ्यांकडुन करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील आदिवासी भागातील तालुक्यांमध्ये रस्त्यांच्या कामात अनियमितता असल्याबाबत**

**(३५) ४२९०८ (२९-०४-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयातील आदिवासी भागातील इगतपूरी, त्र्यंबकेश्वर, कळवण, पेठ, सुरगणा इ. तालुक्यांमध्ये मागील दोन तीन वर्षापासून स्थानिक आदिवासी वाड्या-पाड्यांना कोणत्या रस्त्यांची गरज आहे याची माहिती न घेताच मागील तारखा टाकून कामांना शिफारशी व कार्यारंभ आदेश जिल्हा परिषदेतून देत असल्याची तक्रार मा.लोकप्रतिनिधी यांनी विभागीय आयुक्त यांच्याकडे केली असल्याचे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तक्रारीवर शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२७-०६-२०१६)** :(१) होय.
(२) मागील तारखा टाकून कामांना शिफारशी व आदेश दिल्याचे जिल्हा परिषद, नाशिक यांच्या निदर्शनास आले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे माजगांव (ता.खालापूर, जि.रायगड) नजीक उतारावर नादुरुस्त रस्त्यावर पडलेले खड्डे दुरुस्त करण्याबाबत**

**(३६) ४४६२७ (२९-०४-२०१६). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे माजगांव (ता.खालापूर, जि.रायगड) नजीक उतारावर पावसाळ्याच्या सुरुवातीला पडलेले खड्डे अद्यापपर्यंत बुजविण्यात न आल्यामुळे खड्याचा आकार वाढत जावून सतत वाहनांचे अपघात होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्यालगत शेतामध्ये विहिर असल्याने याठिकाणी महिलांची पाण्यासाठी ये-जा होत असल्याने त्यांच्या जिवीताला सुध्दा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील रस्ता तातडीने दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०६-२०१६) :**(१) अंशतः खरे आहे.

(२), (३) व (४८ सावरोली खारपाडा रस्ता रामा १०४ रस्त्यावर कि.मी. ३४/६०० या मध्ये माजगांव हे गांव वसलेले आहे. सदर गावादरम्यान पडलेले खड्डे, खडी व डांबर मिश्रित खडीने भरुन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

---

**सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील सहा आदिवासी बहुल गावांना पेसा कायद्यातून वगळण्यात आल्याबाबत**

**(३७) ४५४७७ (२९-०४-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील सहा आदिवासी बहुल गावांना पेसा कायद्यातून वगळण्यात आल्याने आदिवासी युवकांना विविध शासकीय योजनांपासून तसेच नोकऱ्यांपासून वंचित रहावे लागत असल्याने सदर गावांचा पुन्हा अनुसूचित क्षेत्रामध्ये समावेश करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.१६/१२/२०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मा.मुख्यमंत्री तसेच मा.आदिवासी विकास मंत्री यांचेकडे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनामार्फत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२०-०६-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) केंद्र शासनाच्या दिनांक २ डिसेंबर, १९८५ च्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित क्षेत्र जाहिर केलेले आहे. सदर अनुसूचित क्षेत्रातील समाविष्ट गावांना पेसा कायदा लागू आहे. नाशिक जिल्हयातील सिन्नर तालुका अनुसूचित क्षेत्रामध्ये समाविष्ट नसल्यामुळे सिन्नर तालुक्यातील गावांना पेसा कायदा लागू नाही.

अनुसूचित क्षेत्रामध्ये एखादे गाव समाविष्ट करणे किंवा वगळणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आहे. यासंदर्भात अनुसूचित क्षेत्र निश्चित करण्यासाठी आवश्यक निकषांमध्ये पात्र गावांचा नव्याने समावेश करण्यास्तव केंद्र शासनास शिफारस करण्याची बाब विचाराधीन आहे.

---

**जळगांव जिल्हयातील पारोळा-अंमळनेर रस्त्याची झालेली दुरावस्था**

**(३८) ४६०७४ (२९-०४-२०१६). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील पारोळा-अंमळनेर रस्त्याची दुरावस्था झाली असुन त्या ठिकाणी अपघाताचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व सदर रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केला वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्नांकित रस्त्यावरील अमळनेर ते पारोळा दरम्यान किमी १०७/३८० ते १२६/३८० अशी एकूण १९.०० किमी लांबीमध्ये रस्त्यांची काही कामे पूर्ण झाली असून काही कामे प्रगतीत आहेत. सद्य:स्थितीत दुरुस्ती करुन रस्ता वाहतुकीस योग्य आहे.

---

**पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींना ग्रामविकास व जलसंधारण विभागामार्फत उपयोजनेच्या एकुण मंजुर नियतव्ययाच्या ५ % निधि देण्याबाबत**

**(३९) ४६५७० (०६-०५-२०१६). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींना ग्रामविकास व जलसंधारण विभागामार्फत आदिवासी उपयोजनेच्या एकुण मंजुर नियतव्ययाच्या ५ % निधि देणे बाबतचा शासन निर्णय निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १५ नोव्हेंबर, २०१५ रोजीपर्यंत या शासन निर्णयाची अंमलबजावणी झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२७-०६-२०१६) :**(१) होय.

(२) नाही.

(३) शासन निर्णय दिनांक २१-४-२०१५ अन्वये निर्णय घेतल्यानुसार माहे सप्टेंबर-ऑक्टोबर २०१६ मध्ये अनुसूचीत क्षेत्रातील १३ जिल्हा परिषदांतर्गत ग्रामपंचायतींना ५% अबंध निधी शासन स्तरावरुन वितरीत करण्यात आला आहे. तसेच सदर निधीचा कशाप्रकारे विनियोग करावा व सदर निधीतून कोणती कामे हाती घ्यावीत याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी ग्रामस्तरीय प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे भेटा ते ढाकणी रस्ता (ता.औसा, जि.लातूर) या रस्त्यावरील**
**नाल्यावर नविन पुलाचे बांधकाम करण्याबाबत**

**(४०) ४७६०१ (२९-०४-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भेटा ते ढाकणी रस्ता (ता.औसा, जि.लातूर) या रस्त्यावरील नाल्यावर नविन पुलाचे बांधकाम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलांचे बांधकाम व रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) असल्यास, सदर कामास किती खर्च येत असून ही कामे तातडीने करण्याबाबत शासनास अजून किती कालावधी लागणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०६-२०१६) :**(१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्ह्यात वार्षिक आदिवासी उपयोजना (टीपीसी/ओटीएसपी) अंतर्गत निधी पडून असल्याबाबत**

**(४१) ४७९४७ (२९-०४-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनातर्फे जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना (टीपीसी/ओटीएसपी) अंतर्गत जळगांव जिल्ह्यात सुमारे सहा कोटी ३० लाख रुपये पडून असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा निधी मार्च अखरेपर्यंत खर्च न झाल्यास हा निधी व्यपगत होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा निधी अद्यापपर्यंत खर्च न करण्याची कारणे काय आहेत व यांस जबाबदार कोणते अधिकारी आहेत,

(४) असल्यास, यांस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विष्णु सवरा (२७-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदरच्या निधी खर्च करण्याबाबतचे नियोजन करण्यात आलेले होते.तसेच अंतर्गत ५% निधी थेट ग्रामपंचायतीना उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्यामुळे नमूद करण्यात आलेला निधी मार्च, २०१६ अखेर खर्च झालेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**झरीजामणी ते पांढरकवडा (ता.झरीजामणी, जि.यवतमाळ) या मुख्य रस्त्याची झालेली दुरावस्था**

**(४२) ४८१२४ (२९-०४-२०१६). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झरीजामणी ते पांढरकवडा (ता.झरीजामणी, जि.यवतमाळ) या मुख्य रस्त्याची दुर्दशा झाली असून रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडल्याने अपघातांचे प्रमाण वाढले असल्याचे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्याची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत त्यानुसार सदरहू रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व ४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाथरी (जि.परभणी) तालुक्यातील रस्त्यासाठी नाबार्ड योजनेतून रुपये १८ कोटींचा निधी मंजूर करुनही रस्त्याच्या कामांना सुरुवात न केल्याबाबत**

**(४३) ४८४११ (२९-०४-२०१६). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि.परभणी) तालुक्यातील रस्त्यासाठी नाबार्ड योजनेतून रुपये १८ कोटींचा निधी अर्थसंकल्पीय अधिवेशनात मंजूर केला असतांनाही अद्याप रस्त्यांच्या कामांना सुरुवात करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर रस्त्यांची कामे तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०७-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) नाबार्ड अंतर्गत ७ कामे असून त्यापैकी ३ कामे पूर्ण झाली असून सदर रस्ते सुस्थितीत आहेत. सद्य:स्थितीत प्रगतीत असलेली ३ कामे व नव्याने नाबार्ड २१ अंतर्गत सन २०१६-१७ मध्ये मंजूर एक काम अंदाजपत्रक स्तरावर आहेत. उर्वरित कामे प्राधान्यानुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**महाराष्ट्रातील ३८४९ कि.मी. लांबीच्या राज्य महामार्गाचे राष्ट्रीय महामार्गात रुपांतर करण्याबाबत**

**(४४) ४८६८५ (२९-०४-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील ३८४९ कि.मी. लांबीच्या राज्य महामार्गाचे राष्ट्रीत महामार्गात रुपांतर करण्याबाबत व या रस्त्याचे रुंदीकरण करण्यासाठी सल्लागारामार्फत प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम (राष्ट्रीय महामार्ग) विभाग व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेमार्फत सल्लागार निश्चितीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निविदा निश्चितीची कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०६-२०१६) :**(१) होय.

(२) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे ३९३४ कि.मी. लांबीच्या ३३ रस्त्याचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम राष्ट्रीय महामार्ग व परिवहन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून सोपविण्यात आले असून या पैकी २७ रस्ते प्रकल्पांसाठी सल्लागार नेमण्यात आले असून ६ प्रकल्पांसाठी सल्लागार नेमणुकीची निविदा प्रक्रिया सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिन्नर पूर्व भागातील (जि.नाशिक) दहिवाडी, उज्जनी, महाजनपूर या गावांना जोडणारा रस्ता दुरुस्त करण्याबाबत**

**(४५) ५०२५० (२९-०४-२०१६). श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर पूर्व भागातील (जि.नाशिक) दहिवाडी, उज्जनी, महाजनपूर या गावांना जोडणारा रहदारीचा रस्ता अनेक वर्षे दुरुस्ती अभावी दुर्लक्षीत राहिल्याने अक्षरश: वाहन चालकांना वाहन चालविताना त्रास होवून अनेक अपघात होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा रस्ता दुरुस्त करण्याबाबत स्थानिक जनतेनी तसेच लोकप्रतिनिधीनी सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांच्याकडे वारंवार निवेदने व मागणी करुन सुध्दा कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील रस्ता तातडीने दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्नांकित रस्त्यापैकी दहिवाडी, उजनी, महाजनपूर या गावांना जोडणारा रसता इजिमा-६८ दर्जाचा आहे. रस्त्याची लांबी २०.२०० किमी आहे. इजिमा - ६८ ते उजनी व दहिवाडी ते महाजनपूर हा रस्ता ग्रामा-९५ दर्जाचा आहे. दोन्ही रस्ते डांबरी पृष्ठभागाचे आहेत. रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे डांबर मिश्रीत खडीने भरण्यात आले आहेत. तसेच रस्त्याच्या काही भागातील आवश्यक दुरुस्तीची कामे मंजुरी, निधी निकष व प्राधान्यक्रमानुसार होती घेण्याचे नियोजन आहे.

रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत चालू आहे.

---

**नांदेड जिल्ह्यातील मुदखेड-भोकर-इस्लामपूर-किनवट-घोटी-अंबाडी-पिंपळगाव ते राज्यमार्ग क्र.१० या रस्त्याचे काम अपूर्ण असल्याबाबत**

**(४६) ५१४४० (२९-०४-२०१६). श्री.प्रदीप नाईक (किनवट) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील मुदखेड-भोकर-इस्लामपूर-किनवट-घोटी-अंबाडी-पिंपळगाव ते राज्यमार्ग क्रमांक १० या रस्त्यावर पूरहानी अंतर्गत नुतनीकरणाचे काम मंजूर असून दीड वर्षाचा कालावधी लोटूनही माहे जानेवारी, २०१६ अखरे पूर्ण करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामाबाबत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार सदर रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०६-२०१६) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) पूरहानी कार्यक्रम गट-ई अंतर्गत ६ कामे मंजूर होती. त्यापैकी ५ कामे पूर्ण असून १ काम प्रगतीत आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**मुंबई-पुणे एक्सप्रेस वे वरील खालापूर (जि.रायगड) टोल प्लाझाजवळ मलनि:स्सारण प्रक्रीया प्रकल्प उभारण्याबाबत**

**(४७) ५१५१७ (२९-०४-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-पुणे एक्सप्रेस वे वरील खालापूर (जि.रायगड) टोल प्लाझाजवळ प्रवाशांनी खाऊन टाकलेले खाद्यपदार्थ व अन्य कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी मलनि:स्सारण प्रक्रीया प्रकल्प उभारण्याचा आदेश माहे जानेवारी, २०१६ च्या अंतिम आठवड्यात वा त्या सुमारास राष्ट्रीय हरीत लवादाने दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय हरीत लवादाच्या आदेशान्वये सदर ठिकाणी मलनि:सारण प्रक्रीया प्रकल्प उभारण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०७-२०१६) :**(१) होय.
(२) राष्ट्रीय हरीत लवादाच्या आदेशानुसार मलनि:सारण प्रकल्पाची उभारणी करुन दिनांक २१.०४.२०१६ रोजी कार्यान्वित करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात वन अधिकार कायद्याची अंमलबजावणी बंद करण्याबाबत**

**(४८) ५१५९९ (०७-०५-२०१६). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नऊ वर्षापूर्वी अस्तित्वात आलेल्या वन अधिकार कायद्याची अंमलबजावणी दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ पासून बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन दरबारी आदिवासींचे दावे प्रलंबित व निर्णयाच्या प्रतिक्षेत आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नूसार चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने प्रलंबित दावे तात्काळ निकाली काढण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे वा करण्यात आली आहे,
(५) नसल्यास, कार्यवाहीस होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२०-०६-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) वनहक्क कायद्यांतर्गत दाखल दाव्यांच्या अभिलेखावरील जिल्हास्तरीय समितीचा निर्णय अंतिम असून त्यानुसार वनहक्क दाव्याबाबतची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय वनहक्क समिती यांना सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत वेळोवेळी शासनामार्फत आढावा घेण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील पिंपळगाव ते गव्हाळीमळा रस्ताचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(४९) ५१९७९ (२५-०४-२०१६). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील मंचर-निरगुडसर रस्त्यावरील पिंपळगाव ते गव्हाळीमळा या सुमारे २ कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या कामासाठी ९० लाख रुपयांचा निधी मंजूर असतानाही या कामाचे टेंडर भरणारा ठेकेदार काम परवडत नसल्याचे सांगून काम करण्यास टाळाटाळ करत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंचर-निरगुडसर रस्त्यावरील चांडोली फाटा ते बेलसरवाडी या रस्त्याचे काम गेल्या अनेक वर्षापासून झालेले नसल्याने रस्त्यावर सर्वत्र खड्डे पडले असून प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.
पिंपळगांव ते गव्हांळीमळा हा रस्ता २.०० कि.मी. लांबीचा असून रस्त्याच्या दुरुस्तीचे मंजूर काम संबंधित ठेकेदारानी पूर्ण केले आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
प्रश्नांकित रस्त्यापैकी पिंपळगाव ते बेलसर वाडी ही ५.०० कि.मी. लांबी प्रजिमा क्र. १३ चा भाग आहे. या लांबीतील रस्त्यावरील खड्डे भरण्यात आले आहेत. चांडोली फाटा (तुकानाका चौक) ते बेलसर वाडी हा ७.०० कि.मी. लांबीचा रस्ता असून यापैकी चांडोली फाटा (तुकानाका चौक) ते गव्हाळी मळा ही २.०० कि.मी. लांबी इ.जि.मा. २४ चा भाग आहे. ही लांबी जिल्हा परिषद बांधकाम (उत्तर) विभाग पुणे यांच्या अखत्यारीत आहे. गव्हाळी मळा ते बेलसर वाडी ही लांबी ५ कि.मी. असून प्रजिमा १३ चा भाग आहे. हा रस्ता सार्वजनिक बांधकाम

विभागाच्या अखत्यारीत आहे. या रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे. या रस्त्यांवरील काही भागात करावयाच्या दुरुस्तीची कामे मंजूरी, निधी, निकष व प्राधन्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(३), (४), (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जालना जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्याविरुध्द शासनाने कारवाई करण्याबाबत**

**(५०) ५२५६१ (२९-०४-२०१६). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्याविरुध्द शासनाने कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव माहे फेब्रुवारी, २०१६ च्या सुमारास शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सार्वजनिक विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी कोणत्या कर्तव्यात कसूर केल्याबाबत ही कारवाई करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०७-२०१६) :** (१) होय.
(२) व (३) जालना जिल्ह्यातील हट्टा-तळणी-शिवनगीरी रस्त्याच्या कामात झालेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने संबंधित जबाबदार अधिका-यांविरुध्द दिनांक २/५/२०१६ रोजीच्या शासन आदेशान्वये विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.